# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी – २८१८४५५३


जा.क्र.मनपा/उदयान/१४९/२०२५-२६ दिनांक :-०३/०६/२०२५

## // परिपत्रक //

मिरा भाईंदर महानगरपालिका **५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षदिंडी, वृक्षारोपण व "हर घर नर्सरी" अंतर्गत वृक्षांच्या बिया वाटप** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. कै.अरविंद पेंडसे उद्यान, गोल्डन नेस्ट, मिरारोड (पु) येथून वृक्षदिंडीचे आयोजन सकाळी ७.३० वाजता करण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रमात शाळेतील मुले, नागरिक,अधिकारी/कर्मचारी यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असणार आहे. त्यानंतर दिपक हॉस्पिटल रोड ते आरक्षण क्र.२४२ येथिल मनपा रोडवर मा.आयुक्त सो यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येणार आहे. वृक्षारोपण झाल्यानंतर आरक्षण क्र.२४२ उद्यानामध्ये जागतिक पर्यावरण दिनाचे महत्व याबाबत मा.आयुक्त सो शाळेतील मुलांना,नागरिकांना संबोधित करणार आहेत.

त्या दृष्टीने महानगरपालिकेतर्फे आयोजित **५ जून जागतिक पर्यावरण** दिनानिमित्त वृक्षदिंडी, वृक्षारोपण व "हर घर नर्सरी" अंतर्गत वृक्षांच्या बिया वाटप कार्यक्रमाकरिता **कै.अरविंद पेंडसे उद्यान, गोल्डन नेस्ट, मिरारोड (पु) येथून दि.०५/०६/२०२५ रोजी सकाळी ०७:३० वाजता** मा.आयुक्त तथा प्रशासक श्री.राधाबिनोद अ.शर्मा यांच्या प्रमुख उपस्थीतीत वृक्षदिंडी मार्गस्थ होणार आहे.

तरी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थीत राहावे.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति:-**

**सर्व अधिकारी / कर्मचारी**